# महाराष्ट्र पक्षिमित्र पुरस्कार 2026
## माहितीपत्रक

पक्षी संवर्धन, जनजागृती या क्षेत्रात सातत्याने केलेल्या कामाबद्दल तसेच पक्षी विषयक संशोधन, संवर्धन, जनजागृती, पक्षी उपचार, सेवा व सुश्रुषा या क्षेत्रात कार्यरत व्यक्ती/ संस्थांचा गौरव व्हावा व त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने २०१९ पासून महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे पुरस्कार देण्यात येत असतात. त्यानुसार २०२६ या वर्षासाठी खालील पुरस्कारांसाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. या पुरस्काराची माहिती तथा नियम व अटी पुढीलप्रमाणे.

1 महाराष्ट्र पक्षिमित्र जीवन गौरव पुरस्कार
2 महाराष्ट्र पक्षिमित्र संशोधन पुरस्कार
3 महाराष्ट्र पक्षिमित्र संवर्धन व सुश्रुषा पुरस्कार
4 महाराष्ट्र पक्षिमित्र जनजागृती पुरस्कार
5 महाराष्ट्र पक्षिमित्र पत्रकारिता पुरस्कार
6 पक्षी साहित्य पुरस्कार

प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तिथी – **दि. १५ ऑक्टोबर २०२६**

### 1. जीवन गौरव पुरस्कार-

**स्व. रमेश लाडखेडकर स्मृती "महाराष्ट्र पक्षिमित्र जीवन गौरव पुरस्कार'-२०२६** असे पुरस्काराचे नाव असेल. दीर्घकाळ पक्षिमित्र चळवळीत राहून पक्षी संवर्धन, अधिवास संवर्धन, पक्षीविषयक जनजागृती यासाठी कार्य केलेल्या जेष्ठ व्यक्तीच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा पुरस्कार देण्यात येईल. यासाठी वयाची किमान ६० वर्षे पूर्ण केलेल्या व्यक्तीस हा पुरस्कार देण्यात येईल. महाराष्ट्र पक्षिमित्र चे सभासद, पक्षिमित्र संमेलनामधील सहभाग, पक्षिमित्र चळवळीतील सहभाग ई. चा प्राधान्यक्रमाने विचार करण्यात येईल. पुरस्कार राशी रु. ५०००/- प्रमाणपत्र, मानपत्र व स्मृतिचिन्ह असे पुरस्कारचे स्वरूप राहील. हा पुरस्कार विदर्भ पक्षिमित्र मंच, व्दारा. **डॉ. अनिल पिंपळापुरे** यांचे तर्फे प्रायोजित करण्यात आलेला आहे.

### 2. पक्षी संशोधन पुरस्कार-

**स्व. डॉ. जी. एन. वानखेडे स्मृती "महाराष्ट्र पक्षिमित्र संशोधन पुरस्कार –२०२६**असे पुरस्काराचे नाव असेल. हा पुरस्कार पक्षिमित्र चळवळीत राहून पक्षी अभ्यास, संशोधन, आणि त्यातून संवर्धन असे कार्य करणाऱ्या या क्षेत्रातील कार्यरत व्यक्ती किंवा संस्था यांना देण्यात येईल. पीएचडीचे संशोधन, प्रकल्पातील कार्य, संशोधन निबंध, प्रकाशित साहित्य, पेपर, रिपोर्ट, पक्षी नोंदणी अहवाल ई. चा विचार करण्यात येईल. पुरस्कार राशी रु. २५००/- ,

प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह असे पुरस्कारचे स्वरूप राहील. हा पुरस्कार स्व.डॉ.जी.एन.व्ही. मेमोरियल मेडल फंड तर्फे स्व. डॉ. जी. एन. वानखेडे यांचे विद्यार्थ्यांकडून प्रायोजित करण्यात आलेला आहे.

### 3. पक्षी संवर्धन व सुश्रुषा पुरस्कार-

**नामदेवराव बहादुरे "महाराष्ट्र पक्षिमित्र, संवर्धन व सुश्रुषा पुरस्कार -२०२६** असे पुरस्काराचे नाव असेल. हा पुरस्कार पक्षिमित्र चळवळीत राहून पक्षी संवर्धन, अधिवास संवर्धन, जखमी पक्षी उपचार व सुश्रुषा या क्षेत्रात कार्यरत व्यक्ती किंवा संस्था यांना देण्यात येईल पुरस्कार राशी रु. २५००/- , प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह असे पुरस्कारचे स्वरूप राहील. हा पुरस्कार **श्री. अनिल बहादुरे, नागपूर** यांचे तर्फे प्रायोजित करण्यात आलेला आहे.

### 4. पक्षी जनजागृती पुरस्कार-

**रामभाऊ शिरोडे (वाणी) स्मृती, महाराष्ट्र पक्षिमित्र, जनजागृती पुरस्कार -२०२६** असे पुरस्काराचे नाव असेल. हा पुरस्कार पक्षिमित्र चळवळीत राहून पक्षी अभ्यास, आणि त्यातून जनजागृती आणि संवर्धन असे कार्य करणाऱ्या या क्षेत्रातील कार्यरत व्यक्ती किंवा संस्था यांना देण्यात येईल. पुरस्कार राशी रु. २५००/- इतकी रक्कम व  प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह असे पुरस्कारचे स्वरूप राहील. हा पुरस्कार **श्री. अविनाश शिरोडे, नाशिक** यांचे तर्फे प्रायोजित करण्यात आलेला आहे.

### 5 पक्षिमित्र पत्रकारिता पुरस्कार

**स्व. प्रकाशसिंह नारायणसिंह मोरे स्मृती 'महाराष्ट्र पक्षिमित्र** पत्रकारिता **पुरस्कार-२०२६** असे या पुरस्काराचे नाव असेल. पक्षी विषयक जनजागृती व संवर्धन होण्यासाठी सकारात्मक पत्रकारिता करणाऱ्या नियमित पत्रकार यांना दर एक वर्षाआड हा पुरस्कार देण्यात येईल. पुरस्कार राशी रु. २५००/- इतकी रक्कम व  प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह असे पुरस्कारचे स्वरूप राहील. हा पुरस्कार **श्री. किरण मोरे, अमरावती** यांचे तर्फे प्रायोजित करण्यात आलेला आहे.

### 6 पक्षी साहित्य पुरस्कार

**श्रीमती सुशीला पाटकर स्मृती, महाराष्ट्र पक्षिमित्र, पक्षी साहित्य पुरस्कार -२०२६**असे पुरस्काराचे नाव असेल. हा पुरस्कार पक्षी विषयक साहित्यामधील योगदानासाठी देण्यात येईल. प्रकाशित साहित्यामुळे पक्षीविषयक ज्ञानाचा प्रसार व प्रचार होण्यासाठी झालेली मदत व पक्षी विषयक जनजागृती मध्ये साहित्याचे योगदान याचा यामध्ये प्रामुख्याने विचार केला जाईल.  पुरस्कार राशी रु. ५०००/- इतकी रक्कम व  प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह असे पुरस्कारचे स्वरूप राहील. हा पुरस्कार **अॅड. चंदना साळगावकर, मुंबई** यांचे तर्फे प्रायोजित करण्यात आलेला आहे.

## नियम आणि अटी

जीवन गौरव पुरस्कार हा एका व्यक्तीस आणि इतर पुरस्कार हे व्यक्ती किंवा संस्था यांना देण्यात येतील. यासाठी पुरस्कार राशी, प्रमाणपत्र /मानपत्र, स्मृतिचिन्ह असे पुरस्कारचे स्वरूप राहील. दरवर्षी प्रत्येकी एक पुरस्कार देण्यात येईल, गरज पडल्यास विभागून देण्यात येईल (जीवन गौरव सोडून). सर्व पुरस्कार त्या त्या वर्षी होणाऱ्या संमेलनात प्रदान करण्यात येतील. पुरस्कारासाठी संस्था निवड करण्यात येत असल्यास म. प. संलग्नित संस्थेस

प्राधान्य देण्यात येईल. वरील पुरस्कारांसाठी स्वतः किंवा इतर व्यक्ती किंवा संस्था मार्फत प्रस्ताव सादर करता येतील. एखाद्या गटात योग्य प्रस्ताव प्राप्त न झाल्यास पुरस्कार जाहीर करण्यात येणार नाही. पुरस्कार निवडीसाठी निवड समिती कार्यकारिणी सभेत ठरविण्यात येऊन समिती प्राप्त प्रस्तावांवर सर्वंकष विचार करून पुरस्कार विजेत्यांची नावे महाराष्ट्र पक्षिमित्रकडे सादर करेल. विजेत्यांची नावे महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे जाहीर करण्यात येतील. **महाराष्ट्र पक्षिमित्र कार्यकारिणीतील सदस्य किंवा त्यांचे कुटुंबीय या पुरस्कारासाठी अर्ज करू शकणार नाहीत, किंवा त्यांना पुरस्कार देण्यात येणार नाही.**

### पक्षी साहित्य पुरस्कार

**पक्षी साहित्य** पुरस्कार हा दरवर्षी एका व्यक्तीस त्यांच्या पक्षी विषयक साहित्य योगदानासाठी देण्यात येईल. साहित्य प्रकाशित स्वरूपातील असावे. साहित्यामध्ये पुस्तके, वृत्तपत्र, नियतकालिके इ मध्ये प्रकाशित लेख/ लेखमाला (गद्य, पद्य) अशा स्वरूपाच्या साहित्याचा विचार केला जाईल (ई-बुक, ब्लॉग, वेबसाईट इत्यादी वरील लिखाणाचा विचार केला जाणार नाही). प्रकाशित साहित्य हे मागील पाच वर्षातील असावे (उदा. २०२६ च्या पुरस्कारासाठी २०२० ते २०२५ या कालावधीतील असावे). प्रकाशित साहित्यामुळे पक्षीविषयक ज्ञानाचा प्रसार व प्रचार होण्यासाठी झालेली मदत व पक्षी विषयक जनजागृती मध्ये साहित्याचे योगदान याचा विचार केला जाईल. आपल्या प्रस्तावा सोबत प्रकाशित साहित्याच्या प्रत्येकी दोन प्रती पाठविणे अनिवार्य आहे.
वरील पुरस्कारांसाठी स्वतः प्रस्ताव सादर करावा लागेल. एखाद्या गटात योग्य प्रस्ताव प्राप्त न झाल्यास पुरस्कार जाहीर करण्यात येणार नाही. पुरस्कार निवडीसाठी निवड समिती ठरविण्यात येऊन, सदर समिती प्राप्त प्रस्तावांवर सर्वंकष विचार करून पुरस्कार विजेत्याचे नाव महाराष्ट्र पक्षिमित्रकडे सादर करेल. विजेत्यांची नावे महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे जाहीर करण्यात येतील. **महाराष्ट्र पक्षिमित्र कार्यकारिणीतील सदस्य, पक्षिमित्र संपादक मंडळ मधील व्यक्ती किंवा त्यांचे कुटुंबीय या पुरस्कारासाठी अर्ज करू शकणार नाहीत, किंवा त्यांना पुरस्कार देण्यात येणार नाही.**

पुरस्कारासाठी प्रस्ताव महाराष्ट्र पक्षिमित्रच्या प्रती, कार्यवाह, महाराष्ट्र पक्षिमित्र, व्दारा- प्रा. डॉ. गजानन वाघ, ६३, अरण्यार्पण, समता कॉलनी, कठोरा रोड, अमरावती ४४४६०४ या पत्त्यावर **किंवा** Scan **केलेला** संपूर्ण प्रस्ताव PDF स्वरुपात संस्थेचा इमेल- pakshimitra@gmail.com वर पेपरलेस सुद्धा पाठविता येईल. आपला प्रस्ताव **दि. १५ ऑक्टोबर २०२६** पर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. पक्षी सप्ताहा दरम्यान पुरस्कारार्थी यांची नावे जाहीर करण्यात येतील. पुरस्कार प्राप्त व्यक्तीस निवड झाल्याचे इमेल/ पत्र किंवा फोन व्दारे कळविण्यात येऊन अगामी संमेलनाची तारीख सुद्धा कळविण्यात येईल, तसेच तारीख निश्चित झाल्यानंतर रीतसर निमंत्रण पाठविण्यात येईल. अधिक माहितीसाठी 7030101981 or 9822875773 या क्रमांकावर संपर्क करू शकता.

## पक्षीमित्र जीवन गौरव पुरस्कारासाठी भरावयाचा अर्जाचा नमुना
## व्यक्ती करिता

अर्जदाराचे नाव-

स्त्री/ पुरुष –

जन्म तारीख-

शिक्षण व अनुभव -

पत्र व्यवहाराचा पत्ता-

इमेल-

फोन नंबर-

संलग्नित संस्था -

पक्षिमित्र चे सभासद आहात का? (असल्यास सभासद क्र. व सभासदत्व घेतल्याची तारीख)-

पक्षिमित्रच्या उपक्रमातील सहभाग -

(संमेलनात सहभाग / संमेलनात सादरीकरण/ आयोजक म्हणून जबाबदारी/ संमेलनाचे अध्यक्षपद/ पक्षिमित्र अंकामध्ये लिखाण /पक्षी सप्ताह आयोजन/ नायलॉन मांजा आंदोलन ई.)-

पक्षीविषयक कार्य (अभ्यास/ संशोधन/ जनजागृती/ संवर्धन/ प्रकाशित संशोधन)-

पक्षी गणनामध्ये सहभाग (महापक्षी गणना/ डॉ. सालीम अली पक्षी गणना/ सुगरण पक्षी गणना/ पाणपक्षी गणना/ सामान्य पक्षी गणना)-

संकटग्रस्त पक्षी अभ्यास/ संवर्धन विषयक कार्य :-

पक्षी संवर्धन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य-

प्रकाशित साहित्य-

प्राप्त पुरस्कार-

प्रस्ताव सादर करणाऱ्यांची माहिती (इतरांकडून सादर केल्यास)- नाव, पत्ता, फोन नंबर.

(प्रत्येक मुद्याची माहिती स्वतंत्र भरता येईल, आवश्यक तेथे प्रमाणपत्रे, बातम्या, ई ची झेरॉक्स प्रत जोडावी.)

# महाराष्ट्र पक्षीमित्र पुरस्कारासाठी भरावयाचा अर्जाचा नमुना (फक्त सबंधित मुद्द्यातील माहिती भरावी)

# (व्यक्ती आणि संस्था करिता)

1. **कोणत्या पुरस्कारासाठी अर्ज करणार आहात ? - (खालील पैकी कुठल्याही एका पुरस्काराचे नाव नमूद करावे)** जीवन गौरव पुरस्कार / संशोधन पुरस्कार / संवर्धन व सुश्रुषा पुरस्कार / जनजागृती पुरस्कार / पत्रकारिता पुरस्कार / पक्षी साहित्य पुरस्कार

2. अर्जदाराचे नाव-
3. स्त्री/ पुरुष –
4. जन्म तारीख-
5. शिक्षण :
6. व्यवसाय :
7. अनुभव :
8. पत्र व्यवहाराचा पत्ता-
9. इमेल-
10. फोन नंबर-
11. पक्षिमित्र चे सभासद आहात का? संस्था महाराष्ट्र पक्षिमित्र सोबत संग्लग्नित आहे का ? (असल्यास सभासद क्र. व सभासदत्व घेतल्याची तारीख)-
12. पक्षिमित्रच्या उपक्रमातील सहभाग -

(संमेलनात सहभाग / संमेलनात सादरीकरण/ आयोजक म्हणून जबाबदारी/ संमेलनाचे अध्यक्षपद/ पक्षिमित्र अंकामध्ये लिखाण /पक्षी सप्ताह आयोजन/ नायलॉन मांजा आंदोलन ई.)-

13. पक्षीविषयक कार्य (अभ्यास/ संशोधन/ जनजागृती/ संवर्धन/ प्रकाशित संशोधन)-
14. पक्षी गणनामध्ये सहभाग (महापक्षी गणना/ डॉ. सालीम अली पक्षी गणना/ सुगरण पक्षी गणना/ पाणपक्षी गणना/ सामान्य पक्षी गणना)-
15. संकटग्रस्त पक्षी अभ्यास/ संवर्धन विषयक कार्य :-
16. पक्षी संवर्धन व उपचार क्षेत्रातील कार्य-
17. प्रकाशित साहित्य-
18. प्राप्त पुरस्कार-
19. प्रस्ताव सादर करणाऱ्यांची माहिती (इतरांकडून सादर केल्यास)- नाव, पत्ता, फोन नंबर.-

(प्रत्येक मुद्याची माहिती स्वतंत्र भरता येईल, आवश्यक तेथे प्रमाणपत्रे, बातम्या, ई ची झेरॉक्स प्रत जोडावी.)

# महाराष्ट्र पक्षीमित्र पक्षी साहित्य पुरस्कारासाठी भरावयाचा अर्जाचा नमुना
# व्यक्ती करिता

अर्जदाराचे नाव-

स्त्री/ पुरुष –

जन्म तारीख-

शिक्षण :

व्यवसाय :

अनुभव :

पत्र व्यवहाराचा पत्ता-

इमेल-

फोन नंबर-

पक्षी विषयक प्रकाशित साहित्य / पुस्तके –

(यादी जोडून त्यासोबत त्या साहित्याच्या दोन प्रती हार्ड कॉपी मध्ये पाठवाव्यात)

पक्षिमित्र अंकामध्ये लिखाण -

पक्षिमित्रचे सभासद आहात का? (असल्यास सभासद क्र. व सभासदत्व घेतल्याची तारीख)-

पक्षिमित्रच्या उपक्रमातील सहभाग -

पक्षीविषयक कार्य (अभ्यास/ संशोधन/ जनजागृती/ संवर्धन/ प्रकाशित संशोधन)-

प्राप्त पुरस्कार-

प्रस्ताव सादर करणाऱ्यांची माहिती (इतरांकडून सादर केल्यास)- नाव, पत्ता, फोन नंबर.-

(प्रत्येक मुद्याची माहिती स्वतंत्र भरता येईल, आवश्यक तेथे प्रमाणपत्रे, बातम्या, ई ची झेरॉक्स प्रत जोडावी.)

**संपूर्ण प्रस्ताव PDF स्वरुपात संस्थेच्या इमेल वर सुद्धा पाठवू शकता.**

**(Save Paper Save Environment)**

**अधिक माहितीसाठी** संस्थेच्या इमेल वर - pakshimitra@gmail.com किंवा 7030101981 / 9822875773 या संस्थेच्या मोबइल वर संपर्क करू शकता